Vedantaa

Institute of Medical Sciences

## Life Saved at Accident Site

On the Mumbai–Ahmedabad National Highway, a young man injured in an accident was given life-saving assistance by a medical a student of our institute Dr. Sanket Nagare

Dr. Sanket Nagare, an MBBS final-year student, Vedantaa institute of medical Sciences, Dahanu, provided timely and appropriate CPR, saving the life of the seriously injured youth. The accident occurred around 6 p.m. near Amboli Bridge on the highway when a bike was hit by a container truck with great force. Due to the accident, Sagar Bolada, a resident of Dahanu, was severely injured.

Dr. Sanket Nagare, who was passing by, noticed the incident. He immediately went to the spot and examined the injured person. The young man was not breathing. Without wasting a moment, Dr. Sanket administered CPR. After a while, Sagar's breathing returned, and his heartbeat also stabilized. He was then taken to the hospital.

It is truly a proud moment for our institute, and we wholeheartedly appreciate Dr. Sanket Nagare for his timely action, dedication, and exemplary service. His act of courage and compassion will surely inspire many others to step forward and make a difference in times of need.

सकाळ

### वैद्यकीय विद्यार्थ्यामुळे वाचला तरुणाचा जीव

#### अपघातग्रस्तासाठी कृत्रिम श्वसन ; कर्तव्यनिष्ठेतून मानवतेचा संदेश


संकेत नागरे

कासा, ता. २६ (बातमीदार) : महामार्गावर आंबोली कटजवळ झालेल्या अपघातात एका दुचाकीस्वार तरुणाला कंटेनरने जोरदार धडक दिली. या अपघातग्रस्ताच्या डोक्यातून रक्तस्राव सुरू झाल्यावर त्याचा श्वासोच्छ्वास बंद पडला होता. अशावेळी एमबीबीएसचा विद्यार्थी संकेत नागरे याने तत्काळ धाव घेत कृत्रिम श्वसन (सीपीआर) सुरू केले. १० ते १५ मिनिटांच्या प्रयत्नांनंतर त्या तरुणाची हृदयगती पुन्हा सुरू झाली आणि श्वासोच्छ्वास चालू झाला. त्याच्या धाडसी निर्णयामुळे तरुण मृत्यूच्या उंबरठ्यावरून परत आला.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर आंबोली कटजवळ संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास झालेल्या अपघातात दुचाकीस्वार सागर बोलाडा याला कंटेनरने धडक दिली. मृत्यू क्षणभरावर येऊन ठेपलेला असताना तो रक्ताच्या थारोळ्यात विव्हळत पडला होता. अपघातानंतर घटनास्थळी मोठी गर्दी जमली; मात्र त्या तरुणाला मदत करण्यासाठी किंवा रुग्णवाहिकेला फोन करण्यासाठी कोणीही पुढे सरसावले नाही. याच वेळी सासवंद येथील वेदान्ता इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमधील एमबीबीएस अंतिम वर्षाचा विद्यार्थी संकेत नागरे हा तेथे आला होता. अपघात पाहताच त्याने तत्काळ धाव घेतली आणि भविष्यातील डॉक्टर म्हणून आपली जबाबदारी ओळखून जखमी तरुणास मदत सुरू केली. नागरे याने ताबडतोब कृत्रिम श्वसन सुरू केल्याने त्याचे प्राण वाचले. यानंतर घटनास्थळी उपस्थित झालेले नागरिक मदतीला धावले.

नागरिकांनी रिक्षाची व्यवस्था करून गंभीर तरुणाला सासवंद येथील रुग्णालयात दाखल केले. तातडीच्या वैद्यकीय उपचारांमुळे त्याची प्रकृती स्थिर करण्यात डॉक्टरांना यश आले. संकेतने विद्यार्थीदशेतच दाखवलेल्या या कर्तव्यनिष्ठ कार्यामुळे समाजात मानवतेचा संदेश देणारी ही घटना सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

Mumbai, Palghar-Today
27/11/2025 Page No. 3